# भाग-ठेवी-कर्ज वाटप-कर्ज वसुली चा ''चौकोन''

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ ला अधिन राहून प्रत्येक पतसंस्थेला सहकार खात्याकडून मंजूर करून घेतलेल्या उपविधीच्या आधारे काम करणे बंधनकारक असते. ज्यामध्ये पतसंस्थांनी उपलब्ध परिस्थितीनुसार विविध योजनांचा नियमांतर्गत समावेश करून आपले काम सहजपणे यशस्वी कसे होईल, यासाठी सातत्याने काम करावयाचे असते. आणि हिच मुलभूत **किल्ली** महाराष्ट्र राज्यातील पतसंस्थांनी यथाशक्ती वापरलेली आहे.

पतसंस्था कार्यक्षेत्रातील पात्र व्यक्तींना सभासद बनवून संस्थेच्या सर्वांगिण कामकाजात कायद्याने अधिकार दिला जातो. हेच सभासद त्या पतसंस्थांमध्ये ठेवींच्या विविध प्रकारच्या योजनांमध्ये रकमा गुंतवीत असतात. अशा प्रमाणे भाग व ठेवींच्या माध्यमातून जमा झालेल्या एकत्रित रकमांचा विनियोग **कॅश रिझर्व्ह व लिक्वीडीटीचे** प्रमाण प्रथम कायम ठेवावे लागते. उर्वरित संपुर्ण रकमेचे कर्जवाटप सभासदांना उपविधीमध्ये समाविष्ट केलेल्या बाबींची पुर्तता करून आवश्यक सर्व कागदपत्रे व तारण घेऊन कर्जे वाटली जातात. वाटप केलेल्या कर्जाच्या रकमा नियमानुसार व्याजासह वसुली करण्याची जबाबदारी पतसंस्थांवरच असते. आणि या सर्व कामकाजात पतसंस्थांचे पदाधिकारी, संचालक, अधिकारी व कर्मचारी यांना अत्यंत जागरूकपणे व नियमितपणे **विश्वस्ताची भूमिका** स्विकारून करावे लागते. म्हणूनच ही पतसंस्थांची सहकारी चळवळ ''**सर्व सामान्यांची, सर्व सामान्यांसाठी सर्वसामान्यांनी चालविलेली** '' सहकारी चळवळ अशा शब्दांत प्रचलित झालेली आहे.

म्हणून **भाग-ठेवी-कर्जवाटप-कर्जवसुली** हा चौकोन ह्या पध्दतीने तयार झालेला आहे. आणि हाच चौकोन व त्या चौकोनाच्या अंतर्गत व बाहेरसुध्दा अनेक गोष्टी समाविष्ट असतात. व त्यांची सुध्दा जाणिवपुर्वक अंमलबजावणी करण्याची जबाबदारी पतसंस्थांची असते. पतसंस्थांनी एका बिगर कर्जदार सभासदाकडून किती भागाची रक्कम स्विकारायची व कर्जदार सभासदाकडून किती भागाची रक्कम स्विकारायची, ह्याला सहकार कायद्यानुसार बंधन आहे. तसेच स्विकारलेल्या भागांवर नियमितपणे दरवर्षी लाभांष देण्यासारखा कारभार करून भागधारकांचे आर्थिक हितसंवर्धन पतसंस्थांमार्फत करण्याची जबाबदारी सुध्दा पतसंस्थांचीच असते. शिवाय हे सभासद मंजूर उपविधीतील कार्यक्षेत्रातीलच असणे बंधनकारक असते. तो सभासद उपविधीतील व कायद्यातील तरतुदीप्रमाणे सभासद होण्यास पात्र असावा लागतो. आणि याप्रमाणे सभासदत्व दिल्यानंतर, **भाग प्रमाणपत्र** त्या सभासदाला देवून पतसंस्थेतील त्याची मालकी कायद्याने वरीलप्रमाणे पुर्ण केली जाते. शिवाय पतसंस्थेने भाग-भांडवल किती जमा करायचे याची उपविधीमध्ये **अधिकृत भाग - भांडवल** ह्यानावाने स्पष्ट केलेले असते. त्याच्या पलिकडे पतसंस्थांना सभासदांकडून भाग रूपाने अतिरिक्त रक्कम स्विकारण्यास मज्जाव असतो. एकंदरीत पतसंस्थेचे सभासद होणे किंवा करून घेण्यासाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व महाराष्ट्र सहकारी सस्था नियम १९६१ च्या कलम २२, २३, २४, २५, २५ अ, २६, २७, २८, २९, ३०, ३१, ३२, ३२ अ, ३३, ३४, व ३५ तसेच नियम १९, १९ अ, २०, २१, २२, २३, २४, २५, २६, २७, २८, २९, ३० च्या आधारे **सभासद, त्यांचे हक्क व त्यांचे दायित्व** याला अनुसरूनच कार्यप्रणाली मंजूर उपविधीला अधिन राहून स्विकारावी लागते.

वरीलप्रमाणे सभासद आपल्या पतसंस्थेमध्ये कायदा व नियमानुसार बनविलेल्या विविध प्रकारच्या ठेव योजनांमध्ये रकमा गुंतवितात. आणि त्यावर जास्तीत जास्त किती व्याजदर लावायचा हे सुध्दा नियमानेच करावे लागते. **जास्त ठेवी पतसंस्थेमध्ये याव्यात** यासाठी नियमाच्या बाहेर जावून ठेवींवर व्याजदर जास्त दिल्याने संबंधित पतसंस्था निश्चितपणे भविष्यात अडचणीत येवू शकतात. तसेच दैनंदिन ठेव योजनांमध्ये काम करणारे **एजंट** यांना देत असलेले कमिशन यावर सुध्दा **पतसंस्थांनी अभ्यासपुर्वक अत्यल्प व परवडेल एवडे कमिशन देणे पतसंस्थांच्या हिताचे असते.** अन्यथा भविष्यात ह्या कमिशन देण्याच्या स्पर्धेमध्ये व कार्यपध्दतीमुळे पतसंस्था तोट्यात जावू

शकतात. आणि त्याचा परिणाम पतसंस्थेच्या एकंदरीत संपुर्ण कारभारावर होवून नकळतपणे केलेली चूक सर्वांचे अस्तित्व नष्ट करण्यास कारणीभूत होवू शकते.

**ठेवीवर द्यावयाचे व्याज व कर्जावर आकारावयाचे व्याज** ह्यावर उपविधीमध्ये स्पष्टपणे मार्गदर्शन केलेले आहे. सर्वसाधारणपणे **४ टक्क्यांपेक्षा जास्त तफावत या दोन्हीमध्ये असणार नाही** याचेही बंधन पतसंस्थांना पाळावे लागते. **४ टक्क्यांच्या मार्जिनमध्ये पतसंस्थांना** आपला सर्व इतर **व्यवस्थापकीय खर्च भागवून सभासदांना लाभांष** देण्याची तरतूद करून व इतर कायदेशीर तरतुदींची पुर्तता करून, एकंदरीत कामकाज पार पाडावयाचे असते. त्यामुळे जमा झालेल्या भाग रकमा व ठेवींच्या रकमा, याचा विनियोग प्रथम **कॅश रिझर्व्ह व लिक्विडीटीमध्ये** रकमा स्थिर करून व कायदेशिररित्या गुंतवणूक करून उर्वरित रकमा **सी. डी. रेषो** प्रमाणामध्ये ठेवण्याचे भान ठेवून कर्जाचे वाटप पतसंस्थांना करावे लागते. सभासद झाल्यानंतर विहित वेळ पुर्ण केल्यानंतरच कर्जदार किंवा जामिनदारांची ग्राह्यता ठरविण्यासाठी पतसंस्थांची नियमावली असते. आणि यामध्ये एकही अपवाद कुठल्याही परिस्थितीत होणार नाही, याचीही काळजी पतसंस्थांना घ्यावी लागते. पतसंस्थेचे अधिकारी व कर्मचारी यांनी पतसंस्थेकडे प्राप्त झालेली कर्ज प्रकरणे संचालक मंडळाच्या सभेमध्ये कर्ज नियमावली, उपविधी व कायद्याला अधिन राहून, मंजूर रकमेसाठी शिफारस करणे किंवा नामंजूरीच्या कारणांसहितचा अहवाल संचालक मंडळाच्या विचारार्थ व निर्णयासाठी सादर करावयाचा असतो. आणि संचालक मंडळाने **सभासद, ठेवीदार, पतसंस्था, उपविधी, कायदा व सामाजिक बांधीलकी** या सर्वांचा निपक्षपातीपणे विचार करुन प्रत्येक कर्जप्रकरणावर निर्णय घ्यायचा असतो. आणि त्या **निर्णयाला पूर्णपणे संचालक मंडळ कायद्याने जबाबदार असते.** यासाठी संचालक मंडळाने अत्यंत स्थितप्रज्ञाप्रमाणे ही भूमिका सातत्याने बजवायची असते. आणि एवढे करुनही वाटप केलेले कर्ज, कुठल्याही कारणास्तव थकीत झाले तर **पहिला, दुसरा व तिसरा हप्ता थकल्यानंतर** नियमितपणे त्या त्या वेळी नोटीसा कर्जदार व जामिनदार यांना त्यांच्या सर्व कामाच्या / व्यवसायाच्या / निवासाच्या व गावच्या पत्यांवर नियमानुसार देणे, त्याचा आढावा घेणे व यानंतरही थकीत कर्ज वसुल न झाल्यास **कलम ९१ किंवा १०१** अंतर्गत कर्ज वसुलीचा दाखला मिळविण्यासाठी दावा दाखल करणे, ही संचालक मंडळाची कायदेशीर जबाबदारी असते. दाखल केलेला दावा व त्याची सुनावणी कमीत कमी कालावधीत कशी होईल, यासाठी न्यायालयात आग्रह धरणे व प्रत्येक सुनावणीस पतसंस्थेचा अधिकृत प्रतिनिधी हजर राहणे, हे आवश्यक व जबाबदारीचे काम असते. आणि एकदा ह्याप्रमाणे कर्ज वसुलीचा दाखला न्यायालयाकडून प्राप्त झाल्यानंतर नेमलेल्या **एस्.आर.ओ.** च्या माध्यमातून नियमानुसारच कर्ज वसुली करण्याच्यी कार्यपद्धती अवलंबावी लागते. ज्यामध्ये प्रथम कर्ज वसुली दाखल्याच्या आधारे नोटीस बजावणे, नंतर जप्तीची नोटीस देणे, नंतर जप्तपूर्वीची नोटीस देणे, नंतर नियमानुसार जप्ती करणे, नंतर जप्ती केल्यानंतर नियमानुसार स्थावर व अस्थावर मालमत्तेची विल्हेवाट लावणे व त्यातून प्राप्त झालेल्या रकमा संबंधित कर्ज खात्यात भरून घेणे, एवढया गोष्टी उपविधी व कायद्याला अधिन राहून, **प्रसंगी पोलिसांचे संरक्षण घेऊन** थकबाकी वसुलीचे काम नियमितपणे संचालक मंडळाला करावे लागते.

म्हणून वर उल्लेखिलेल्या **चौकोनाची** पूर्ण माहिती संचालक, कर्मचारी व संचालकांना असणे क्रमप्रात्र आहे. म्हणून या अग्रलेखाद्वारे पतसंस्थांमध्ये काम करण्याऱ्या कार्यकर्त्यांना व कर्मचाऱ्यांना वरील चौकोनाची व्याप्ती व थोडक्यात माहिती दिलेली आहे. त्याचा जरुर आधार घ्यावा व अंमलबजावणी करावी असे या निमित्ताने आवाहन करीत आहे.

**जय हिंद! जय महाराष्ट्र!! जय सहकार!!!**